विषयः- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत. ( उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना Incident Commander व Assistant Incident Commander नियुक्त करणेबाबत.)

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/को./सीआर-
दि.०५/०४/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.
३) आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ चे कलम ३०, ३३, ३४, ४१ व कलम ५१
४) भारत सरकार, गृह मंत्रालय, आदेश क्र.४०-३/२०२०-डी दि.२४.०३.२०२०
५) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दिनांक २५.०३.२०२०

**आदेशः-**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशातंर्गत कोरोना विषाणू संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहेत. तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशातंर्गत विमान प्रवासाद्वारे प्रवासी भारतात व इतरत्र प्रवास करीत आहेत. त्यामुळे कोरोना विषाणूचे संशयित रुग्ण नांदेड जिल्हयातही आढळून आल्याचे निदर्शनास आलेले आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूंचे संसर्गात अधिक वाढ होवू न देता तात्काळ उपाय योजना आखणे आवश्यक आहे. सदर संशयित रुग्णामुळे आपत्तीजनक परिस्थिती उध्दभवू नये यासाठी पुर्वतयारी करणे अगत्याचे झाले आहे.

ज्याअर्थी, भारत सरकार गृह मंत्रालय यांनी दि.२४.०३.२०२० अधिसूचना अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही करताना अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाने दि.२५.०३.२०२० च्या अधिसूचना अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही करताना अंमलबजावणीच्या सविस्तर सूचना दिलेल्या आहेत.

आणि ज्या अर्थी मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे. त्यामध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

त्याअर्थी मी, डॉ. विपीन इटनकर, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी नांदेड जिल्हयात आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील तरतुदीनुसार व कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२०

Scanned by CamScanner

पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचनेतील अधिकाराचा वापर करून, या आदेशाव्दारे **सर्व उपविभागीय अधिकारी, जि. नांदेड** यांना त्यांचे अधिनस्त तालुक्याकरीता अंमलबजावणीसाठी Incident Commander म्हणून घोषीत करीत आहे. तसेच **सर्व तहसिलदार, जि. नांदेड** यांना त्यांच्या तालुक्यासाठी Assistant Incident Commander म्हणून घोषीत करीत आहे.

नियुक्त अधिकारी यांनी केंद्र शासनाच्या दि.२४.०३.२०२० व राज्य शासनाच्या दि.२५.०३.२०२० रोजी निर्गत केलेले मार्गदर्शक सुचनाप्रमाणे व यापुढे शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होणा-या सुचनांनुसार उपययोजना करणेकामी त्यांचे कार्यक्षेत्रात आवश्यक ती कार्यवाही करावी.

नियुक्त अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त मनुष्यबळ व साधनसामुग्रीचा यथोचित वापर करून त्यांना सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडावी. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये आपल्या अधिनस्त शासनाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडे अधिगृहीत करण्यात आलेल्या आहेत, याची सर्वांना जाणीव करून द्यावी.

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

**(डॉ. विपीन इटनकर,भा.प्र.से.)**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**तथा जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, मुंबई.
३) मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
४) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
६) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
७) पोलीस अधीक्षक, नांदेड
८) अध्यक्ष, इंडीयन मेडीकल असोसिएशन, नांदेड
९) जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड
१०) जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड
११) सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,नांदेड
१२) सर्व उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
१३) सर्व तहसिलदार, नांदेड जिल्हा
१४) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायत, जि.नांदेड
१५) सर्व संबंधित विभाग प्रमुख ----------------------

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

**(डॉ. विपीन इटनकर,भा.प्र.से.)**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**तथा जिल्हाधिकारी नांदेड**

Scanned by CamScanner